महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

MEHUNBARE POLICE STATION
मेहुणबारे पोलीस स्टेशन जि.जळगाव
E-MAIL ID - mehunbaraps@gmail.com
दुरध्वनी क्रं. 02589-286023

जावक क्रमांक 100/2025 मेहूणबारे पोस्टे. दिनांक :-10/04/2025

प्रेसनोट

प्रति,

संपादक,

----------------------------

आपणांस याद्वारे कळविण्यात येते की, मेहूणबारे पोलीस स्टेशनला फिर्यादी कोकिळाबाई गोकूळ राजपूत, रा. वडगांव लांबे, ता. चाळीसगांव यांनी फिर्याद दिल्यावरुन गुरनं. 48/2017 भादंवि कलम 326, 504 प्रमाणे दिनांक 29/05/2017 रोजी गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यातील आरोपी किरण अर्जून पाटील, वय-50, रा. वडगांव लांबे, ता. चाळीसगांव याने शेताच्या वादातून फिर्यादीस शिवीगाळ करुन वखरणीच्या लोखंडी रुम्हन ने फिर्यादीच्या पतीच्या डोक्यात मारुन दुखापत केली यावरुन वरप्रमाणे गुन्हा दाखल होता. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीने पोहेकॉ2343 भालचंद्र पाटील यांनी केलेला असून तपासाअंती त्यांनी दिनांक 29/09/2018 रोजी इकडील पोस्टे दोषारोप क्र. 45/2017 अन्वये मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

सदरची केस सन 2025 मध्ये मा.यादव साहेब प्रथमवर्ग न्यायाधीश, चाळीसगांव यांचे न्यायालयात बोर्डावर येऊन त्यात साक्षीपुरावे होऊन मा. न्यायालयाने गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 05/04/2025 रोजी दोषी ठरवून शिक्षा ठोठावली आहे आणि सदर आरोपीस दोषी ठरवून त्यास चांगल्या वर्तवणूकवर 1 वर्ष प्रोफेशनल पिरेडवर सोडण्यात आले आहे. सदर बॉन्डचा भंग केल्यास त्याला 15000/- रुपयांचा दंड ठोठावण्यात येईल असा निकाल मा. न्यायालयाने दिलेला आहे.

सदर केस कामी सरकारी अभियोक्ता श्री. आर. के. माने यांनी काम पाहिले असून पैरवी अधिकारी पोशि/3302 श्री. कुंदन अडकमोल मेहूणबारे पोस्टे यांनी काम पाहिले आहे. तसेच सदर संपूर्ण केस शाबितीसाठी मा. सहा. पोलीस निरीक्षक श्री. प्रविण दातरे यांनी मार्गदर्शन केलेले आहे.

सदर गुन्हा शाबितीची कार्यवाहीसाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी सो, जळगांव, मा अपर पोलीस अधीक्षक चाळीसगांव श्रीमती कविता नेरकर व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सो चाळीसगांव, श्री. राजेशसिंह चंदेल यांचे मार्गदर्शनाने लाभले आहे.

प्रविण अ. दातरे
सहा. पोलीस निरीक्षक
मेहुणबारे पो. स्टे,जि.जळगांव